महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,
गट-अ मधील उपसंचालक, आरोग्य
सेवा संवर्गातील बदल्या / पदस्थापना

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः पदस्था-२०१८/प्र.क्र.१५५/सेवा २

गो.ते.रुग्णालय इमारत संकुल , १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : १४ मे, २०१८

शासन आदेश -

महाराष्ट्र वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४)(दोन) व कलम ४ (५) मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट- अ मधील "सहसंचालक, आरोग्य सेवा व उपसंचालक, आरोग्य सेवा " या संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव खालीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१	डॉ. नितीन नथ्थुजी अंबाडेकर,उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.	सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई (श्रेणीअवनत) (रिक्त पदी) तसेच सह संचालक, आरोग्य सेवा (खरेदी), मुंबई (अतिरिक्त कार्यभार)
२	डॉ.विजय पोशट्टीवार कंदेवाड, उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबद	सह संचालक, आरोग्य सेवा (प्रा.आ.केंद्र / उपकेंद्र / दवाखाने),मुंबई (श्रेणी अवनत) (रिक्त पदी)
३	डॉ.सतिश पवार, अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई (श्रेणी अवनत)	सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग),पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार
४	डॉ.राजकुमार चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय, अकोला	उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला या पदाचा अतिरिक्त कार्यभार
५	डॉ.स्वप्नील लाळे, प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नागपूर	उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद (डॉ.कंदेवाड यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी)
६	डॉ.संजय जयस्वाल, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,नागपूर (श्रेणी अवनत)	प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार

२. बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे आणि संबंधीत अधिकाऱ्याने त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर होऊन त्याबातचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा,मुंबई व शासनास सादर करावा.

३. संबंधीत अधिकारी यांनी त्यांच्या मूळ पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सांभाळून पुढील आदेश होईपर्यंत सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा.

३ संबंधीत अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्वाकारावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्राकाडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास , ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरवतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

४. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर, तात्काळ नविन पदस्थापनेवर रुजू व्हावे, जे अधिकारी या कालमर्यादेचे पालन करणार नाहीत आणि पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता परस्पर गैरहजर राहतील, अशा अधिकाऱ्यांची अनुपस्थिती “अनधिकृत अनुपस्थिती” म्हणून समजण्यात येईल व पर्यायाने त्यांच्या सेवेत खंड होईल याची जाणीव सर्व संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

५. संचालनालयाने जे अधिकारी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांचे विरुध्द वेळीच प्रशाकीय कारवाई सुरु करावी व आवश्यकतेनुसार सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा. या प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व अनुपालन अहवाल शासनास विहित कालमर्यादेत सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१११५०७२४४६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2018.05.14 15:17:13 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ.,मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
४) सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन),मुंबई
५) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
६) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
७) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
१०) जिल्हा कोषागार अधिकारी (अकोला, औरंगाबाद, नागपूर,पुणे)

११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२) निवासी लेखा अधिकारी,मुंबई
१३) मा.मंत्री (सा.आ.) / मा.राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव
१४) प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्वीय सहायक
१५) सर्व संबंधीत अधिकारी (संचालक, आरोग्य सेवा यांच्या मार्फत)
१६) कक्ष अधिकारी/ अवर सचिव /उपसचिव/सहसचिव (सर्व) सा.आ.वि.मंत्रालय,मुंबई
१७) निवडनस्ती (सेवा -२)